लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आंबेडकरांना अभिवादन

शिवाजी विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती गुरुवारी उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर जयंती समारंभाचे प्रमुख पाहुणे राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. सुरेंद्र जोंधळे यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. जी. आर. पळसे, डॉ. एस. एस. महाजन, आर. के. कामत, भारती पाटील, अभय जायभाये, पी. एस. कांबळे, आर. जी. सोनकवडे, के. डी. सोनवणे, पी. एन. वासंबेकर, अविनाश भाले उपस्थित होते.

पुढारी

उपस्थित होते.

## विद्यापीठात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर जयंती समारंभाचे प्रमुख पाहुणे राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. सुरेंद्र जोंधळे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. जी. आर. पळसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक व अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन आदी उपस्थित होते.

पुढारी



रत्नागिरी : येथे आयोजित कार्यक्रमात प्रा. रमेश जाधव यांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर.

# जीवन गौरव पुरस्काराने रमेश जाधव यांचा सन्मान

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

गोगटे-जोगळेकर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग आणि मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राचे उद्घाटन प्रा. डॉ. श्रुती तांबे यांच्या हस्ते झाले.

यावेळी परिषदेच्या वतीने समाजशास्त्राच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या अभ्यासकांचा मान्यवरांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यात सन २०१२, २०२०, २०२१ चे जीवनगौरव पुरस्कार अनुक्रमे डॉ. बी. एल. जोशी, प्रा. डॉ. एस. एल. गायकवाड (औरंगाबाद), प्रा. डॉ. प्रदीप आगलावे (नागपूर), प्रा. रमेश जाधव (कोल्हापूर), प्रा.डॉ. रमेश कांबळे (मुंबई) यांना प्रदान करण्यात आले. तर र. ए. संस्था आणि गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या वतीने प्रा. एस. एन. पवार यांना कृतज्ञता सन्मान प्रदान करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. तुळशीदास रोकडे यांनी केले. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रफुल्लदत्त कुलकर्णी यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली.

पुढारी

# बाबासाहेबांना लोकशाहीत नागरिकांची मूल्याधिष्ठित जीवनशैली अभिप्रेत

## डॉ. सुरेंद्र जोंधळे; विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकशाही म्हणजे केवळ शासन व्यवस्था नव्हे, तर नागरिकांची मूल्याधिष्ठित जीवनशैली व त्यामधील सामाजिक नैतिकता व बुद्धिप्रामाण्यवाद अभिप्रेत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या समारोप समारंभात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जोंधळे म्हणाले, व्यक्तिस्वातंत्र्य, आत्मप्रतिष्ठा व व्यक्तीचे अबाधित हक्क या बाबी बाबासाहेबांना राजकीय लोकशाहीत अभिप्रेत होत्या. त्यात व्यक्तीचे सार्वभौमत्व हे सामायिक असल्याखेरीज खरी लोकशाही अस्तित्वात येणार नाही, असे त्यांचे मत होते. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये फ्रेंच राज्यक्रांतीतून नव्हे, तर बुद्ध तत्त्वज्ञानापासून घेतल्याचे प्रतिपादन बाबासाहेब करतात. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत लोकशाहीच्या विचारांपासून व त्याच्या अंमलबजावणीपासून किती जवळ अथवा किती दूर आहोत, याचे आत्मपरीक्षण करण्याचा हा कालखंड आहे. केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी जी. आर. पळसे, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

15 APR 2022

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुळीक यांना ‘अन्वेषण’ स्पर्धेत पुरस्कार



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वप्नजीत मुळीक यांचा सन्मान करण्यात आला.**

कोल्हापूर, ता. १४ : भारतीय विद्यापीठ संघटना (दिल्ली) आणि सागरी शिक्षण व प्रशिक्षण अ‍ॅकॅडमीच्यावतीने (चेन्नई) राष्ट्रीयस्तरावरील आयोजित ‘अन्वेषण’ स्पर्धेत स्वप्नजीत मुळीक यांना सर्वोत्तम संशोधन प्रकल्प पुरस्कार प्राप्त झाला.

स्पर्धेमध्ये श्री. मुळीक यांनी विविध ‘नॅनो संमिश्रेचा वापरातून अतिशय कार्यक्षम सुपरकपॅसिटरची निर्मिती’ यावर संशोधन प्रकल्प सादर केला होता. प्रकल्पाचे कामकाज शिवाजी विद्यापीठातील प्रा. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. सुलभ पध्दतीने नॅनो संमिश्रे तयार करणे, तसेच कार्यक्षम ऊर्जा साठवणुकीसाठी आवश्यक सुपरकपॅसिटर निर्मिती ही दोन्ही कामे कमी खर्चामध्ये तयार केली असून ही त्यांच्या संशोधनाची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. स्पर्धेत देशभरातील विविध आय. आय. टी., राष्ट्रीय प्रयोगशाळेमधील २०० संशोधकांनी विविध प्रकल्पांचे सादरीकरण केले होते. त्यामधून श्री. मुळीक यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

या विशेष कामगिरीमुळे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरु पी. एस. पाटील, सर्व अधिकारी यांनी अभिनंदन केले. स्पर्धेकरिता समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक, डॉ. केदार मारुलकर, डॉ. कविता वड्राळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

1 5 APR 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकरांना मूल्याधिष्ठित जीवनशैली अभिप्रेत : डॉ. जोंधळे

## विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४: "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकशाही म्हणजे केवळ शासनव्यवस्था नव्हे, तर नागरिकांची मूल्याधिष्ठीत जीवनशैली आणि त्यामधील सामाजिक नैतिकता व बुद्धीप्रामाण्यवाद अभिप्रेत आहे," असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने डॉ. आंबेडकर यांच्या १३१व्या जयंतीनिमित्त आयोजीत फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या समारोप समारंभात ते बोलत होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार' हा विषय होता. राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत लोकशाहीच्या विचारांपासून आणि त्यांच्या अंमलबजावणीपासून आपण किती जवळ अथवा किती दूर आहोत, याचे आत्मपरीक्षण करण्याचा हा कालखंड आहे." संचालक डॉ. एस.एस. महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिंदे यांनी आभार मानले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. भरत नाईक, अभय आयभाये आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्तच्या कार्यक्रमात बोलताना डॉ. सुरेंद्र जोंधळे. शेजारी डावीकडून डॉ. एस. एस. महाजन, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे.

### वक्तृत्व स्पर्धेतील विजेते

**पदव्युत्तर गट :** प्रसाद सुहास लोखंडे (शिवाजी विद्यापीठ), तेजस्विनी संजय पांचाळ (वाणिज्य महाविद्यालय), प्रिती राजेंद्र हेगडे, कैलास आदित मेहाडा, ऋषिकेश प्रताप घाटुगडे ( तिघे शिवाजी विद्यापीठ).

**पदवीस्तर गट :** विदिरा राजाराम विभुते (विवेकानंद महाविद्यालय), संकेत कृष्णात पाटील (भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय), गुरूराज लक्ष्मण रसाळ (कायदे महाविद्यालय, सातारा), इंद्रजा विठ्ठल गोरे (विवेकानंद महाविद्यालय), श्रुती राजाराम कांबळे (पाटील फार्मसी, कोडोली), शुभांगी दशरथ माने (रामराव महाविद्यालय, जत).

सकाळ

# डॉ. आंबेडकरांचे विचार दिशादर्शक : डॉ. जत्राटकर

## शहाजी महाविद्यालयात व्याख्यानमाला

कोल्हापूर, ता. १४ : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार, सामाजिक समतेचे तत्त्व, न्याय हक्कांसाठी त्यांनी दिलेला लढा आजच्या परिस्थितीतही प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीत आणि एकात्मतेसाठी त्यांनी मोठे योगदान दिले'' असे शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सांगितले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात श्रीपतराव बोंद्रे स्मृती व्याख्यानमाला पुष्प आठवे अंतर्गत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता' यावर व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. प्रा. गौतम जाधव यांनी लिहिलेल्या 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर' पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्राचार्य डॉ. शानेदिवाण म्हणाले, ''डॉ. आंबेडकरांनी सर्व धर्मांचा अभ्यास करूनच बौद्ध धर्म स्वीकारला. बौद्ध धर्म अहंकारमुक्त आहे, बुद्धिप्रामाण्यवादी आहे, म्हणून त्यांनी त्याचा स्वीकार केला. डॉ. आंबेडकरांनी दाखविलेल्या विचारांनी आपण जाऊन ती मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्न केले पाहिजेत.''

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. सुरेश शिखरे यांनी स्वागत केले, प्रा. डॉ. सरोज पाटील यांनी ओळख करून दिली. प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. विजय देठे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शहाजी महाविद्यालयात श्रीपतराव बोंद्रे व्याख्यानमालेत बोलताना डॉ. अलोक जत्राटकर.

15 APR 2022

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विदेशी भाषा विभागातर्फे विद्यापीठात प्रमाणपत्र वाटप

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातील विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी त्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले. 'जपान फाऊंडेशन अँड जपान एज्युकेशन एक्स्जेंस अँड सर्व्हिसेस'तर्फे घेतल्या जाणाऱ्या जपानी भाषेच्या जपानी भाषा प्राविण्य चाचणी (जे.एल.पी.टी.) आंतरराष्ट्रीय परीक्षेमध्ये एन-५ स्तरात विदेशी भाषा विभागाच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले.

डॉ. शिर्के म्हणाले, "विदेशी भाषा विभाग शिवाजी विद्यापीठ आणि



औद्योगिक क्षेत्रामधील सशक्त दुवा बनू शकतो." यावेळी डॉ. मेघा पानसरे यांनी मनोगत व्यक्त केले.

केनील मेहता, सोनिया घाटगे, प्रेरणा आळवे, ईश्वरी निंबाळकर, अभिलाषा देशपांडे, रितू काळे, नील हुजूरबाजार, ज्योत्स्ना भाटवडेकर गणफुले, रित्विजा शिंदे यांना गौरवण्यात आले. विदेशी भाषा विभागातील जपान भाषा सर्टिफिकेट, डिप्लोमा कोर्स पूर्ण केल्यानंतर प्रमोद कदम, सौ. पूर्वा नाडगौडा या विद्यार्थ्यांची 'फुजीत्सू' या जपानी कंपनीमध्ये पुणे येथे 'ॲप्लीकेशन डेव्हलपमेंट टेक्निकल ट्रेनी' म्हणून नियुक्ती झाली. त्यांचाही सत्कार करण्यात आला. विदेशी भाषा विभागातर्फे मेनन बेअरींग्ज लिमिटेड कंपनीसाठी 'जपानी भाषा व संस्कृती' यावर कॉर्पोरेट ट्रेनिंग अभ्यासक्रम घेतला होता. हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सहभागी अधिकाऱ्यांना प्रमाणपत्र प्रदान केले. कुलसचिव व्ही. एन. शिंदे, जपानी भाषा शिक्षिका श्रीमती स्नेहल शेट्ये, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत

## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. सुरेंद्र जोंधळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा मंडळाचे संचालक गजानन पळसे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. आर. के. कामत, डॉ. भारती पाटील, अभय जायभाये, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. अलोक जत्राटकर, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. अविनाश भाले आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# 'नेट' जूनच्या पहिल्या आठवड्यात

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाची (यूजीसी) सहायक प्राध्यापक पदासाठीची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) जूनच्या पहिल्या दोन आठवड्यात होणार आहे. वेळापत्रक लवकरच संकेतस्थळावर घोषित करण्यात येईल, अशी माहिती यूजीसीचे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी ट्विटरद्वारे दिली आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या वतीने ही परीक्षा घेण्यात येणार आहे. कुमार यांनी ट्विट करून म्हटले आहे की, डिसेंबर २०२१ आणि जून २०२२ च्या विलीन झालेल्या चक्रांसाठी पुढील नेट परीक्षा जून २०२२ च्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात घेण्यात येईल. 'एनटीए'ने अंतिम तारखा दिल्यावर वेळापत्रक जाहीर केले जाईल, असे कुमार यांनी सांगितले. साधारणपणे, यूजीसी नेटची परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते. मात्र, कोरोनाच्या साथीमुळे पूर्ण वेळापत्रक कोलमडले आहे. अशा वेळी यूजीसीने दोन चाचण्यांची एकच परीक्षा घ्यायचे ठरविले आहे. परीक्षेचे वेळापत्रक घोषित झाल्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापकपदाबरोबरच कनिष्ठ संशोधन शिष्यवृत्तीसाठीची ही पात्रता परीक्षा आहे.